# शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे

जयसिंगपूर : यंदा शेतीची सर्व कामे लवकरच उरकून शेतकरी मॉन्सूनची वाट पहात आहे. पण त्यास होणाऱ्या विलंबामुळे सर्व शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

गेल्या आठवड्यात राज्यातील काही भागात मॉन्सूनने हजेरी लावली होती. पण वातावरणाच्या अनुकुलतेअभावी पुन्हा पावसाने पाठ फिरवल्यामुळे होत असलेल्या विलंबामुळे बळीराजा चिंतेत सापडला आहे.


## क्षारपड जमिन लागवडीखाली आणून हिरव्यागार शेतीसाठी...

एकच चुक पुन्हा पुन्हा नको आता निर्णय पक्का ! सच्छिद्र P.V.C. पाईप घेणार तर..

''भारतातील नंबर १ ग्वॉलियर कंपनीचीच''

- ग्वॉलियर कंपनीच्या बांधकाम विभागाकडून केंद्रा सरकारच्या सहकार्याने भारतातील २१,००० हेक्टर क्षारपड जमिनीवर निचरा प्रणालीचे काम केले आहे.
- ग्वॉलियर कंपनीला भारत सरकारच्या प्लॅस्ट परिषदेकडून पाईप निर्यातीच्या बाबतीत ''दोन नंबरचा उत्तम निर्यातदार'' ('Second Best Exporter Award)
- नवी दिल्ली स्थित आर्थिक घटकांचा अभ्यास करणाऱ्या संस्थेकडून ''उद्योगरत्न'' (Udyograttan Award) पुरस्कार मिळाला आहे.
- ग्वॉलियर ही सच्छिद्र कोरोगेटेड PVC पाईप तयार करणारी भारतातील एकमेव अग्रगण्य कंपनी आहे.
- ग्वॉलियर ची सच्छिद्र कोरोगेटेड PVC पाईप कठीण व लवचीक असून या पाईपवर वजन आदळत झाला तरी त्या फुटत नाहीत, या पाईपमध्ये जास्तीत जास्त वजन सहन करण्याची क्षमता आहे.
- IS-9271: 2004, ASTM-F-800, DIN-1187 या प्रमाणकानुसार पाईपची निर्मिती केली आहे.

क्षारपड जिथे...ग्वॉलियर तिथे...



कोटा राजस्थान फॅक्टरी ऑफिस
E-mail : gplkota@gmail.com

ग्वॉलियर पॉलिपाईप्स लिमिटेड
ISO 9001 : 2000 सर्टीफाईड कंपनी

वितरक
मे.सौरभ कृषी उद्योग
सांगली-416416, मोबा.9657521008
फोन 0233 - 2625108, 2628108
Email : sourabhkrushiudyog@gmail.com


स्वाभिमानी विचार

प्रति,

Book-Post

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No.L2/17/RNP/K.L.P/234/12-14

वर्ष ७ | अंक १४ | १५ जून २०१२ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

**चांदोलीच्या कुशीत अभ्यास शिबिर संपन्न**



"राजकरणासाठी चळवळ कधीच सोडणार नाही
- खासदार राजू शेट्टी





## गणेश बेकरी नांदणी

ताजे व स्वादिष्ठ पदार्थांची रुचकर मालिका....

फरसाणा (नमकीन) • स्विटस् • वेफर्स • बेकरी प्रॉडक्टस्

A/p: Nandani, Tal: Shirol, Dist: Kolhapur. Pin: 416 102 Maharashtra (INDIA) E-mail: ganesh_bakery@yahoo.co.in

• वर्ष ७ • अंक १४ • १५ जून २०१२ • पाने २०

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

• कार्यकारी संपादक •
डॉ. महावीर अक्कोळे

• सह संपादक •
डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार

• निवासी संपादक : सदाभाऊ खोत

• मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर • व्यवस्थापक : सुभाष शेट्टी • कार्यालय : भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशनजवळ, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Email : rajushetti@gmail.com

वार्षिक वर्गणी रु. १००/-

## संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

# राजकारण नि चळवळ

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ता अभ्यास शिबिर २ ते ३ जून रोजी संपन्न झाला. चांदोलीच्या खोऱ्यात नि अभयारण्यात सर्वश्री खासदार राजू शेट्टी यांनी स्वतः सूत्रसंचालन करत एक वेगळीच रंगत आणली होती. चळवळ नि राजकारण यामध्ये किती अंतर आहे. हे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

यंदा अभ्यास शिबिराला संपूर्ण राज्यामधून कार्यकर्ते आलेले होते. दोन हजाराहून अधिक लोकांनी शिबिराला उपस्थिती नोंदवली. यामध्ये अनेक विषयांचा उहापोह करण्यात आला. आगामी ध्येयधोरण, आंदोलने, राजकारण,आदीविषयांवर प्रदीर्घ चर्चा रंगली. पक्ष्यांचा किलबिलाट, डोंगर दऱ्यांच्या खोऱ्यात भारतीय बैठक मारून, सर्वच कार्यकर्त्यांनी आतुरतेने विषय लक्षात घेतले. सदाभाऊ खोत यांनी संपूर्ण राज्यभर दौरा करून आगामी लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार निवडून आणू असा ठाम विश्वास व्यक्त केल्यावर, सर्वांच्याच अंगात एक नवा उत्साह संचारला होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रत्येक वक्ता अगदी पोटतिडकीने बोलत होता. बदलत्या परिस्थितीत देशाच्या अर्थ व समाजकारणात शेती व्यवसायाचे स्थान व शेती व्यवसाय समोरील आव्हाने, राज्यकर्ते शेतकऱ्यांचे शत्रू आहेत का?, स्वाभिमानी पक्ष व संघटनेची बांधणी, ग्रामीण तरुणांसमोरील आव्हाने, शेतकरी चळवळीसमोरील आव्हाने व भविष्यातील वाटचाल, स्वाभिमानी पक्षाची राजकीय भूमिका व त्याचे महाराष्ट्राच्या राजकारणावर होणारे परिणाम आदी विषयांवर चर्चासत्रे जोरात रंगली. अगदी स्वाभिमानी पक्षाची बांधणी याविषयावर रात्री १० वाजेपर्यंत चर्चा होत गेली. प्रत्येकाने आपले विचार व्यक्त करत संघटनेची बांधणी कोणत्या पध्दतीने करावी हे पटवून देत होते. एकूणच संघटनेचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे हे मात्र नक्की.

# शेतीसाठी स्वंतत्र अर्थसंकल्प करा

**खासदार राजू शेट्टी**

चांदोली(प्रतिनिधी): बदलत्या परिस्थितीचा शेतीवर मोठा विपरीत परिणाम होत आहे. केंद्र सरकार रेल्वेचे व आर्थिक अर्थसंकल्प सादर करते. मात्र शेतीवर एवढा मोठा उद्योग अवलंबून असताना, देशातील ६५ टक्के जनता गुजराण करीत असताना त्यावर अर्थसंकल्प अद्याप नसणे ही खेदाची बाब आहे. केंद्राने त्वरीत शेतीवर अर्थसंकल्प सादर करावे अशी जोरदार मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदा राजू शेट्टी यांनी केली. ते बदलत्या परिस्थितीत देशाच्या अर्थ व समाजकारणात शेती व्यवसायाचे स्थान व शेती व्यवसायासमोरील आव्हाने या विषयावर बोलत होते.

खा. शेट्टी म्हणाले की, देशाच्या अर्थकारणात शेतीचा सर्वात मोठा वाटा आहे. ग्रामीण भाग जवळपास शेतीवरच अवलबूंन आहे. कोट्यवधी रूपयांची गुंतवणूक यामध्ये केलेली आहे. असे असताना शेतीवर स्वतंत्र अर्थसंकल्प असणे गरजेचे आहे. केंद्राने याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतीला चांगले दिवस येतील. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीवर आधारित असलेल्या कुटीरोद्योगाला संजीवनी देणे आवश्यक आहे. केंद्राने त्वरीत अर्थसंकल्प जाहीर करावे अशी मागणी त्यांनी यावेळी केली.


श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२१९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वतःचे इमारतीत ■ अद्ययावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ देशातील प्रमुख ४८८ शहरांमधील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवींवर १/२ टक्के जादा व्याज ■ [illegible]

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | बँक सतत | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१९८.५१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | [illegible] टक्के |

श्री. व्ही. बी. हुल्ले. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि. ऑफिसर

श्री. अशोक शां. रूणवाळ. बी. कॉम. व्हा. चेअरमन व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबुराव मोरे एम. ए. चेअरमन

TEXMO INDUSTRIES Taro




• अधिकृत विक्रेते •

बाहुबली इलेक्ट्रिकल्स

गोमटेश इलेक्ट्रिकल्स

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे

M/S. MANGAVE BOREWELLS

BOREWELL CONTRACTOR

Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)

Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



Shree Datta Prestrestess

M.f. PCC Pole

Shirol Road, Jaysingpur.

“

## निर्णायक आंदोलन करणे गरजेचे

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने रान उठविलेच आहे. मात्र दरासाठी संघटनेला दरवर्षी आंदोलन करावे लागत आहे. यासाठी निर्णायक आंदोलन करणे आवश्यक आहे. कारण उसाचा प्रश्न असो वा दुधाचा, शेतीमालाच्या भावाचा, त्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सुटणे आवश्यक आहे. त्यासाठी संघटनेला सरकारशी दोन हात करून उत्पादन खर्चावर हमीभाव मिळवून देणे आवश्यक आहे. यदाकदाचित आपल्याला यासाठी वेळ लागेल मात्र त्या प्रश्नाचा समूळ निकाल लागेल. यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निर्णायक आंदोलन करून शेतकऱ्यांना अधिक न्याय मिळवून दिल्यास याचा निश्चितच फायदा निवडणुकीत होईल. त्याचप्रमाणे स्वाभिमानीचे ५ ते ६ खासदार व २० ते २२ आमदार निवडून येऊ शकतात. यामध्ये स्वाभिमानीची भूमिका निर्णायक असणार आहे. – दत्तप्रसाद दाभोळकर

---

शेतकऱ्यांच्या जीवावर मी सभापती झालेलो आहे. या पदाचा आगामी काळात जास्तीत जास्त तालुक्यातील विकासासाठी उपयोग करून घेणार आहोत. गावातील कार्यकर्त्यांनी माझ्याकडे विकासकामांची यादी द्यावी जेणेकरून मला त्याचा पाठपुरावा करून निधी देता येईल. प्रत्येकवेळी खासदार साहेब वेळ देतीलच असे नाही. म्हणून शक्य तिथे मी स्वतः त्याकडे लक्ष घालत जाईन. मिळालेल्या पदाचा गावातील विकासकामे करण्यास चांगला उपयोग होणार आहे. जि.प. च्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणार असून इच्छुकांनी आपले नावे कार्यालयात द्यावीत, असे आवाहन त्यांनी यावेळी केली. – सावकार मादनाईक(बांधकाम सभापती, जिल्हा परिषद, कोल्हापूर)

---

तळागाळातील लोकांना आपलेसे करून त्यांना योग्य न्याय देता यावे यासाठी अधिक काम करणे गरजेचे आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांवर आपल्या कार्यकर्त्यांचा वरचष्मा असायला पाहिजे. वचक ठेवल्याशिवाय जनतेची कामे होणार नाहीत. खासदार साहेबांनी दिल्लीतून आणखी निधी खेचून आणणे आवश्यक आहे. जि. प. च्या बांधकाम समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वच गावात आपणांस पोहचण्याची चांगलीच संधी आहे. या संधीचे सोने करणे आवश्यक आहे. गरीबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आवश्यक आहे. त्यांना आपला आधार वाटावा असे काम आपण केले पाहिजे. केवळ दिखाऊपणा करून चालणार नाही. प्रत्येक काम लक्ष देऊन केल्यास आपल्याला निश्चितच यश मिळेल, यात शंका नाही. – राजेंद्र गड्ड्यान्नावर

---

तालुक्यातील कार्यकर्त्यांनी गावा गावात वेळोवेळी बैठका घेणे गरजेचे आहे. काही ठिकाणी थोडी मरगळ आहे. ती वेळीच दूर करणे आवश्यक आहे. दुसऱ्या हप्त्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना अधिक आक्रमक होणार आहे. सर्वच साखर कारखान्यावर मोर्चा काढून दुसरे बिल मिळण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. – अण्णासो चौगुले

---

शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी कार्यकर्त्यांनी अधिक आक्रमक होणे गरजेचे आहे. सरकारी कार्यालयातील लूटीचा धंदा आपण बंद करून होणारी लूट थांबविणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा तरी आढावा बैठक घेतलेच पाहिजे. केवळ बोलघेवडेपणा करून चालणार नाही, प्रत्यक्षात कृती करणे आवश्यक आहे. – भगवान काटे

निवडणुकांमध्ये पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. जयसिंगपूर पालिकेच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात पैसा वापरला गेला. त्याचा आपल्याला फटका बसलेला आहे. राजकारणात भ्रष्ट लोकांनी प्रवेश केल्यामुळे त्याला एक वेगळेच रूप आलेले आहे. यामध्ये आपणांस संघर्ष करावा लागणार असून जी मते विकली जातात. त्यावर कुठेतरी पायबंद घालणे आवश्यक आहे. निवडून आलेले सदस्य देखील पैसा कमवू लागले आहेत. राजकारण हे एक समाजकारण म्हणून पाहिले जाते. मात्र याला आता वेगळेच रूप आले आहे. राजकारण म्हणजे पैसा कमिवण्याचा धंदा असल्याचे बोलत आहेत. त्यामधून अनेकांनी आपले घरे भरवून घेतली. मात्र सर्वसामान्यांना न्याय मिळालेला नाही. यासाठी आपण झटले पाहिजे. काही कार्यकर्ते पराभवाने खचले आहेत. मात्र यासाठी त्यांनी खचून न जाता अधिक जोमाने काम केल्यास त्यांना आगामी काळात यश निश्चितच मिळेल. – डॉ. महावीर अक्कोळे

## विदर्भात ताकद द्या, यश निश्चितच मिळेल

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा राज्यभर पसारा वाढलेला आहे. साहेबांनी जरा आमच्या विदर्भात लक्ष द्यायला हवं. कारण विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या अजूनही सुरूच आहेत. तरीही सरकार काही जागे झालेले नाही. त्यांना आता वठणीवर आणले पाहिजे. कार्यकर्त्यांनी लालसा न बाळगता काम करत रहावे, तरच आयुष्यात पुढे जाता येणार आहे. केवळ दिखाऊपणा करून मी किती मोठा आहे. हे सांगून चालणार नाही. जनतेला विश्वासात घेऊन कार्य केले पाहिजे. सत्ताधाऱ्यांना गुडघे टेकायला लावू असे आपण आंदोलन केले पाहिजे. - गजानन अहमदाबादकर

गेली १०ते १५ वर्षे संघटनेसाठी सतत कार्यरत असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आपण अजूनही आक्रमक होणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद व आमदारकीत मला हार स्वीकारावी लागली. मोठ्या धैर्याने याला मी सामोरे गेलो आहे. कार्यकर्त्यांनी अपयश आले म्हणून मूग गिळून गप्प बसून चालणार नाही. अपयश पचविण्याचीही ताकद आपल्यामध्ये असली पाहिजे. तरच आपण राजकारणात यशस्वी होत असतो. शिरोळ तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांनी मतभेद विसरून अधिक जोमाने कामाला लागण्याची आवश्यकता असून खासदार साहेबांनी शिरोळ तालुक्यातील देखील लक्ष घालण्याची त्यांनी यावेळी मागणी केली.

- उल्हास पाटील

तळागाळातील लोकांना आपलेसे करून त्यांना योग्य न्याय देता यावेळी यासाठी अधिक काम करणे गरजेचे आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांवर आपल्या कार्यकर्त्यांचा वरचष्मा असायला पाहिजे. वचक ठेवल्याशिवाय जनतेची कामे होणार नाहीत. खासदार साहेबांनी दिल्लीतून आणखीने निधी खेचून आणणे आवश्यक आहे. जि. प. च्या बांधकाम समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वच गावात आपणांस पोहचण्याची चांगलीच संधी आहे. या संधीचे सोने करणे आवश्यक आहे. गरीबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आवश्यक आहे. त्यांना आपला आधार वाटावा असे काम आपण केले पाहिजे. केवळ दिखाऊपणा करून चालणार नाही. प्रत्येक काम लक्ष देऊन केल्यास आपल्याला निश्चितच यश मिळेल, यात शंका नाही.

- राजेंद्र गड्ड्यान्नावर

“ शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघटेनेने राज्यभर आंदोलने केली आहेत. आपली संघटना केवळ पश्चिम महाराष्ट्रापुरतीच मर्यादीत न राहता विदर्भात आणि मराठवाड्यात देखील आपली ताकद दाखवून दिली आहे. खासदार राजू शेट्टी यांच्या बारामतीमधील आंदोलनामुळे अधिक उभारी मिळालेली आहे. तसेच संघटना वाढीसाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकारण नि चळवळ या दोन्ही बाजू विरूध्द आहेत. आपण केवळ आंदोलन करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. राजकारणातून चांगले व्यक्ती निवडून येणे आवश्यक आहे. म्हणून आपण या प्रवाहात चांगली माणसे आणली पाहिजेत. राजकारणातील ही गटार साफ करणे गरजेचे आहे.

– दशरथ सावंत

स्वाभिमानी शेतकरी संघटनेची उभारणी विचारांवर, कर्तृत्वावर तर आहेच पण त्याहूनही अधिक त्यागावर आहे. येथे काम करणाऱ्या अधिक कार्यकर्त्यांना पदाची लालसा अजिबात जाणवत नाही. शोषक सत्ताधाऱ्यांच्या विरोधी सर्वसामान्यांसाठी राज्यात पर्यायी सत्ता स्थापन करण्यास स्वाभिमानीला खूपच चांगली संधी आहे. २०१४ सालच्या विधानसभेत स्वाभिमानीचे ३५ ते ४० आमदार असतील ही अपेक्षा रास्त आहे. पण अपेक्षित यश गाठण्यासाठी विरोधी पक्षांची शक्तीकेंद्रे आणि मर्यादा लक्षात घेऊन आतापासूनच स्वाभिमानीला आणखी व्यापक व्हावे लागणार आहे. ग्रामीण भाग हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बलकेंद्र आहे. तो अधिक व्यापक करणे गरजेचे आहे. महिला लोकप्रतिनिधींनी आपले अस्तित्व केवळ मिटिंग पुरतेच दाखवणे असे न करता अभ्यासू वृत्तीतून दाखवणे आवश्यक आहे. भविष्यातील स्वाभिमानीचा वाढता पसारा लक्षात घेऊन विविध पातळीवर, विविध क्षेत्रांत आणि विविध घटकांमध्ये काम करणारे आणि कुशल जबाबदारी सांभाळणारे कार्यकर्ते निर्माण होणे आवश्यक आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटना अथवा पक्ष हा केवळ शेतकऱ्यांचाच आहे ही प्रतिमा बदलून गावातील आणि नगरातील सर्व घटक सामावून घेणे आणि घटक प्रांजळपणे सहभागी होणे आवश्यक आहे.

– अश्विनी कांबळे (उपसभापती, पं. स. शिरोळ)

## बुध्दीवंताची फौज निर्माण करा

केवळ आंदोलने करून आपली संघटना वाढणार नाही. यासाठी बुध्दीवंताना आपल्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी आपली ध्येयधोरणे त्यांना पटवून देऊन वक्ते म्हणून त्यांचे विचार जनतेपर्यंत पोहच करणे आवश्यक आहे. जनतेपर्यंत जाऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला पाहिजे. सरकारी कार्यालयामध्ये लुटारूंच्या टोळ्या निर्माण झाल्या आहेत. त्यांना पोसणाऱ्या राज्यकर्त्यांचा अगोदर बंदोबस्त करणे आवश्यक आहे.

– प्रा. जालंधर पाटील

महिला आघाडीचा आपल्या संघटनेत सहभाग अतिशय कमी आहे. त्यांना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. महिला फक्त चूल आणि मूल याकडे न पाहता संघटनेत सक्रिय सहभाग दाखविल्यास महिला आघाडी अधिक सक्षम होईल. महिलांना आपला अस्तित्व दाखविण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना एक चांगले व्यासपीठ आहे.

सौ. वैशाली देवताळे(पंचायत समिती सदस्या)

ज्ञान हा आपला तिसरा डोळा आहे. ज्ञानाच्या आधारेही आपण आपले कर्तृत्व दाखवू शकतो. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना गाडगेबाबा होणे गरजेचे आहे. चारित्र्य स्वच्छ असल्याशिवाय कार्यकर्त्यांना समाजात मानाचे स्थान मिळणार नाही. त्यासाठी चारित्र्य स्वच्छ ठेवावे लागणार आहे.

-बी.जी. पाटील

# गावा गावांत तरूणांची फौज करा: सदाभाऊ खोत

चांदोली(प्रतिनिधी): येणाऱ्या लोकसभा नि विधानसभेच्या निवडणुका आपण पूर्ण ताकदीने लढविणार असून किमान १० जागा खासदारकीच्या लढवणार आहोत. प्रत्येक गावामध्ये तरूणांची फौज निर्माण करा असे, आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी केले. ते स्वाभिमानीची राजकीय भूमिका व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणारा परिणम या सत्रात बोलत होते.



सदाभाऊ खोत म्हणाले, येणारा आगामी काळ आपल्या दृष्टीने फार महत्वाचा आहे. प्रत्येकाने पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केला पहिजे. तरच आपल्या भरघोस यश मिळणार आहे. मी स्वत: संपूर्ण राज्यभर दौरा केला आहे नि करत आहे. गावागावातील संघटनेमध्ये जे काही मतभेद असतील ते त्वरीत निकालात काढावेत. सर्वांनी एकत्र येऊनच संघटनेची बांधणी करणे आवश्यक आहे. एकीकडे आपण आंदोलन करून शेतकऱ्यांच्या मागण्यांना वाचा फोडून न्याय मिळूवन देत आहोत. तर दुसरीकडे समाजातील सर्व स्थरातील लोकांना संघटनेच्या प्रवाहात आणण्याचे काम आपण करत आहोत. तर दुसरीकडे खासदार साहेबांना राज्यभर दौरा करण्यासाठी मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने काम केले पाहिजे. संपूर्ण गावचा विकास करण्यासाठी वेगवेगळ्या योजनांची माहिती ग्रामस्थांपर्यंत कार्यकर्त्यांनी पोहचविणे आवश्यक आहे. केवळ आपल्याला शेतकऱ्यांच्यावर आंदोलन करून चालणार नाही. तर समाजातील सर्व जातीधर्मांची एकत्रित मोट बांधून त्यांनाही आपलेसे करून घेणे आवश्यक आहे. सर्वसामान्यांना या प्रवाहामध्ये सामील करून घेणे आवश्यक आहे. त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच त्यांच्या प्राथमिक गरजांच्या दृष्टीने योग्य त्या सवलतींचा उपयोग करून देणे आवश्यक आहे. जि. प. च्या निवडणुकामध्ये आपल्याला यंदा चांगले यश मिळाले आहे. पंढरपूर, माळशिरस, कोल्हापूर येथे आपण सत्तेत सहभागी झालो आहोत. या सत्तेच्या माध्यमातून आपण समाजाचा विकास करण्याचा प्रयत्न करणार आहोत. अधिक जोमाने काम केल्यास निश्चितच यश मिळायला वेळ लागणार नाही. संपूर्ण राज्यातून यंदा १० लोकसभा मतदार संघ निवडणार आहोत. या १० जागा स्वाभिमानी पक्ष स्व:बळावर निवडून जास्तीत जास्त खासदार निवडून आणून दाखवायचे आहेत. यासाठी आपल्याला प्रत्येक गावातील किमान १० कार्यकर्ते लागणार आहेत. ते कार्यकर्ते संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढतील. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सरकारशी दोन हात करून त्यांना योग्य न्याय मिळवून देतानाच संघटना वाढीसाठी अधिक जोमाने प्रयत्न करावे लागणार आहे. येथून पुढे पदाधिकारी निवडताना आपल्याला एक काळजी घेणे आवश्यक आहे. सर्व समाजाला आपण न्याय देणार आहोत. १८ पगड जातींच्या लोकांना एकत्र आणून संघटनेची बांधणी जोमाने करून घेणार आहोत. यासाठी सात वक्त्यांची टीम तयार करून घेऊन हे सातजण संपूर्ण राज्य पिंजून काढतील. काही दिवसानंतर वक्त्यांचीही शिबिर घेण्यात येणार आहे. त्यांना यामध्ये योग्य ते प्रशिक्षण देऊन काही अधिकारही दिले जाणार आहेत.

सकाळच्या सत्रात बोलताना खोत म्हणाले, शेतकऱ्यांना लाचार करून त्यांना आपले गुलाम बनवायचे पाप या नालायक राज्यकर्त्यांनी सुरू केले आहे. सध्या अनेक घोटाळे उघडकीस येऊ लागले आहेत. काही बडे मंत्री देखील यामध्ये गुंतले आहेत. हा सगळा पैसा त्यांना रिअल इस्टेटीमध्ये गुंतविला आहे. काळा पैसाही मोठ्या प्रमाणात गुंतवण्यात आलेला आहे. काहींनी काळा पैसा पांढरा करून तो पैसा राजकारणात आणून पक्ष वाढविण्याचे काम करू लागले आहेत. याला वेळीच पायबंद घालणे आवश्यक आहे.

# खासदार बनले सूत्रसंचालक

चांदोलीतून : अभ्यास शिबिरामध्ये खा. शेट्टींनी स्वतः कडे माईक घेऊन सूत्रसंचालक बनले. आपल्या दमदार आवाजात त्यांनी सर्वांना उद्देशून म्हणाले, शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी आपली संघटना असून प्रत्येक कार्यकर्त्याने संघटनेच्या बांधणीसाठी नि वाढीसाठी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येक वक्त्याला त्यांनी आपले पते मांडण्यास नि विषयाला अनुसरून बोलण्यास सांगितले.

कोणता वक्ता विषयाला सोडून बोलण्यास सुरूवात केल्यावर खा. शेट्टी मध्येच सुचना देऊन विषयाला अनुसरून बोलण्याची सुचना करत होते. त्यामुळे वक्तेही विषय सोडून बोलत नव्हते. त्यामुळे प्रत्येकाच्या भाषणात अधिकच रंगत येत होती.

# अन्नसुरक्षा कायद्याला विरोध करणार; शेतकऱ्यांच्यासाठीच राजकारणः खा. शेट्टी

चांदोली (प्रतिनिधी) : माझा जीव हा शेतकऱ्यांच्यासाठीच असून त्यांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी मी माझ्या जीवाची पर्वा देखील करणार नाही. अन्नसुरक्षा कायद्याला स्वाभिमानी शेतकरी संघटना कडाडून विरोध करेल, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. ते स्वाभिमानीची राजकीय भूमिका व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणार परिणाम या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष दशरथ सावंत होते.

खा. शेट्टी म्हणाले, अन्नसुरक्षा कायदा अस्तित्वात आणून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे पाप हे सरकार करू पाहत आहे. कारण धान्य खरेदी करताना यामध्ये मोठ्या प्रमाणात पैसा मुरला जातो. भ्रष्टाचार केला जातो. गरिबांच्यापर्यंत पैसाच जात नाही. मधल्यामध्येच पैसे हडप केले जातात. शेतकऱ्यांच्याकडून कमी दरात धान्य खरेदी करणार फार तर त्यामध्ये पैसेही गुंतवणार असे त्यानंतर तेच धान्य खुल्या बाजारपेठेत विक्रीला आणले जाते. असे असताना केंद्र सरकार केवळ ठराविक लोकांना पोसण्यासाठीच हा कायदा आणू पाहत आहे. याचा आम्ही तीव्र विरोध करणार असून मी स्वतः लोकसभेत विरोधकांची मोट बांधून तिथेही आवाज उठविणार आहोत. सरकारी गोदांमाना कीट लागलेली आहे. ७८ हजार टन धान्य गोदाम पडून सडलेली आहे. त्याला वाळीव लागलेली आहे. मात्र गोरगरिबांना ते धान्य दिले जात नाही. तेच धान्य परत दारू करण्यासाठी पाठविले जाते. हे किती दिवस चालणार? संघटनेचे राजकारण हे केवळ शेतकरी आणि सर्वसामान्य व्यक्तीसाठी आहे. गेल्या१० वर्षात चळवळीने अनेक यशअपयशाने पायऱ्या पाहिल्या आहेत. कार्यकर्त्यांनी मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तींकडे जाऊन आपल्या संघटनेची ध्येय धोरणे पठवून देऊन त्यांना आपलेसे करणे महत्वाचे आहे. राज्यात आपली ताकद वाढलेली आहे. त्याला मूर्त स्वरूप देणे गरजेचे आहे. उसाच्या दरावरून आपण एक मोठे आंदोलन केले. काही वर्षापूर्वी दूध आंदोलन करून राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना हजारो कोटी रूपयांचा फायदा मिळवून दिलेला आहे. अजूनही आपल्याला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी झगडावे लागणार आहे. कृषीमुल्य आयोगाकडून १६ टक्के पिकांच्या दर वाढीची शिफारस केलेले आहे. ती शिफारस त्वरीत अंमलात आणणे गरजेचे आहे. अन्यथा याविरूध्द आपल्याला एक भलेमोठे आंदोलन उभे करावे लागेल. शेतकऱ्यांच्या लुबाडणूक कदापि सहन केली जाणार नाही.




वारणावती (ता. शिराळा) : स्वाभिमानी शेतकरी संघटना कार्यकर्ता शिबिर उद्घाटन प्रसंगी बोलताना खासदार राजू शेट्टी. सोबत सदाभाऊ खोत, गजाभाऊ अहमदाबादकर.

# देशाच्या राजकारणात 'स्वाभिमानी' निर्णायक

## खासदार राजू शेट्टी : वारणावतीत पक्षाच्या कार्यकर्ता अभ्यास शिबिराचे उद्घाटन

शिराळा : आपले सर्वसामान्य कार्यकर्ते पंखाखाली घेऊन गगनभरारी मारणाऱ्या नेतृत्वाची आज समाजाला गरज आहे. आजची देशातील राजकीय परिस्थिती पाहता या पुढील काळात देशपातळीवरती स्वाभिमानी पक्षाला निर्णायक भूमिका घ्यावी लागेल, आमची संघटना हिमनगासारखी असल्याने तिचा अंदाज कोणाच्याही बापाला लागणार नसल्याचे प्रतिपादन स्वाभिमानी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांनी केले.

वारणावती (ता. शिराळा) येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने दोन दिवसीय कार्यकर्ता अभ्यास शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत अध्यक्षस्थानी होते.

खासदार शेट्टी म्हणाले,'' आम्ही फुले, शाहु, आंबेडकरांचे फक्त नाव घेत नसून संघटनेच्या माध्यमातून विचारांचा वारसा जपतो. मला माझे कार्यकर्ते घडवण्यासाठी परक्यांची गरज भासत नाही. या संघटनेचे कुटुंब तयार करण्यात सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळत आहे. शेतकरी बांधवांच्या बळावर या संघटनेने व पक्षाने अल्पावधीत प्रगती केली आहे. हाती घेतलेल्या कामाचा निपटारा केल्याशिवाय संघटना गप्प बसत नाही. आमच्या संघटनेत गटबाजीला थारा नसल्याने लोकांचा ओघ या संघटनेकडे वाढत आहे. ज्याचा कार्यकर्ता कणखर त्याची संघटनाही कणखर असते.''

सदाभाऊ खोत म्हणाले, ''केवळ शेतकऱ्यांचे प्रश्न म्हणून शेतकऱ्यांनी संघटनेत सहभागी न होता आरोग्य, कायदा, शिक्षण अशा विविध क्षेत्रातील लोकांनी सहभागी झाले पाहिजे.' गजाभाऊ अहमदाबादकर, सत्तार पटेल यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

खासदार शेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करण्यात आले. विकासराव देशमुख यांनी स्वागत केले. राम पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

सांगली जिल्हाध्यक्ष सयाजीराव मोरे, सुनील चौधरी, जयंत बगाडे, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सावकर मदनाईक, पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रमुख बी. जी. पाटील, संदीप राजोबा, सागर संभुशेटे, अरुण मगदूम, रमेश भोजकर, प्रभाकर पाटील, संभाजीराव मेंडे, सांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, मराठवाडा येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

# न्याय्य हक्कासाठी ‘स्वाभिमानी’च्या कार्यकर्त्यांना पाठबळ द्या : राजू शेट्टी



वाघापूर : येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे आयोजित कार्यक्रमात खासदार राजू शेट्टी यांनी मार्गदर्शन केले. शेजारी एकनाथ जठार, सावकर मादनाईक, राहुल देसाई, डॉ. जालंदर पाटील, अजित पोवार, ज्ञानदेव दाभोळे, किरण कुरडे आदी.

गारगोटी : शेतकऱ्यांनी न्याय्य हक्कांसाठी स्वाभिमानी कार्यकर्त्यांना पाठबळ द्यावे. स्वाभिमानी पक्षाचे कार्यकर्ते सत्तापिपासू नाहीत. भ्रष्ट कारभाराला शह देण्यासाठी व स्वच्छ कारभारासाठी लढाऊ प्रतिनिधी निवडले गेले पाहिजेत, असे मत खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. वाघापूर (ता. भुदरगड) येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शाखेतर्फे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. जिल्हा सरचिटणीस एकनाथ जठार अध्यक्षस्थानी होते. जोतिर्लिंग देवालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. जालंदर पाटील प्रमुख उपस्थित होते.

खासदार शेट्टी म्हणाले, ‘‘पैशाच्या बळावर सत्ता काबीज करणाऱ्या भ्रष्ट राजकारण्यांपेक्षा स्वच्छ चारित्र्याचे कार्यकर्ते निवडा. संघटनेच्या माध्यमातून दहा वर्षे शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी लढा उभारला. या लढ्याला यश मिळाल्याने शेतकऱ्यांना याचा फ ायदा झाला. तरीही शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांच्या मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व शासनदरबारी आवाज उठविण्यासाठी सत्ता तितकीच महत्त्वाची आहे. सत्तेच्या माध्यमातून हा लढा अधिक तीव्र बनविला. याचे फ लित शेतकऱ्यांना पाहावयास मिळत आहे.’’

यावेळी खासदार राजू शेट्टी, जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सावकर मादनाईक, जिल्हा परिषद सदस्य राहुल देसाई, पंचायत समिती सदस्या सौ. वैशाली घोरपडे, राधानगरी पंचायत समिती सदस्य अजित पोवार, दिवाणी न्यायाधीशपदी निवड झालेले राजेंद्र चौगले यांच्यासह मान्यवरांचा सत्कार झाला. बाजीराव शिंदे यांनी स्वागत केले. कोंडिबा जठार यांनी प्रास्ताविक केले. वासुदेव पाटील, उल्हास पाटील, एकनाथ जठार यांची भाषणे झाली. सचिन घोरपडे, ज्ञानदेव दाभोळे, किरण कुरडे, तानाजी भोई, जोतिराम दाभोळे, बाळासो दाभोळे, कमल पाटील, सारिका भोई, तानाजी पाटील, धोंडिराम बरकाळे, दत्तात्रय आरडे, शिवप्रसाद गुरव, कोंडिबा पोवार, दादासो दाभोळे, ईश्वरा आरडे, वाय. डी. कुरडे, वसंत कांबळे, संभाजी देसाई, पांडुरंग गोडसे, सचिन पाटील, बळिराम जठार, मारुती दाभोळे, प्रकाश पाटील, विजय फगरे, नितीन पोवार आदी उपस्थित होते. संदीप बरकाळे यांनी आभार मानले.



वारणावती : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या अभ्यास शिबिरातील एक क्षण.

# शेतकऱ्यांची चळवळ व्यापक होणार?

## दबाव गट निर्माण करण्याचा निर्णय : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अभ्यास शिबिर

शिराळा: झाडांचा मंडप आणि पालापाचोळ्याचा गालीचा करून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्यातील हजारभर कार्यकर्त्यांनी अत्यंत साधेपणाने आपले राज्यस्तरीय अभ्यास शिबिर यशस्वी केले. राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात शेतकऱ्यांचा दबाव गट निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. गाव आणि राज्य पातळीवर संघटन मजबूत करण्याचे ठरले. शिबिर संयोजनातील साधेपणा हा आज कालच्या इव्हेंट मॅनेजमेंटच्या राजकारणात प्रबोधनाची हिरवळ टिकवून ठेवणारा ठरला.

वारणावती येथील चांदोली वसाहतीत झाडांच्या सावलीत हे शिबिर झाले. या शिबिरात बदलत्या परिस्थितीत देशाच्या अर्थ व समाजकारणात शेती व्यवसायाचे स्थान, शेती व्यवसायातील आव्हाने, राज्यकर्ते शेतकऱ्यांचे शत्रू आहेत का?, स्वाभिमानी पक्ष आणि संघटनेची बांधणी, ग्रामीण तरुणांसमोरील आव्हाने, शेतकरी चळवळीसमोरील आव्हाने व भविष्यातील वाटचाल, स्वाभिमानीची राजकीय भूमिका या विषयांवर खुलेपणाने चर्चा झाली. कार्यकर्त्यांनी विधानसभेच्या ३५ ते ४०, तर लोकसभेच्या ७ ते ८ जागा निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यकर्त्यांच्या बोलण्याचा सूर सुधारणेला वाव असणारी उत्तम कामगिरी आपण नोंदवत आहोत असा होता. गाव, तालुका व राज्य पातळीवर युवक, महिला, सुशिक्षित नागरिक यांचा समावेश करून पक्षाचा पाया व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. राज्यभर व्याप वाढवताना मूळ पायाकडे दुर्लक्ष नको, अशी सूचना अनेकांनी केली. तळ कोकण, विदर्भात संघटना वाढवावी, असे सूचवण्यात आले. संघटनेचा विचार सर्वदूर पोहोचवण्यासाठी वक्त्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्याचे ठरले. अन्न सुरक्षा विधेयकाला विरोध करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. खासदार राजू शेट्टी, सदाशिव खोत, जालिंदर पाटील, बी. जी. पाटील या नेत्यांनी आपली

पान ११ वर ▶

# शेतकऱ्यांची चळवळ व्यापक होणार?

▸ पान १० वरुन

चळवळ राजकारणापेक्षा शेतकरी हिताला प्राधान्य देणारी असल्याचे सांगितले. तरुणांचे संघटन मजबूत करण्यासाठी पुढाकार घेण्याचे ठरले. आजकालच्या अभ्यास व चिंतन शिबिराबद्दल रामदास फु टाणे यांनी 'चिंतन शिबिरात नवा विचार सापडला, तांबड्यापेक्षा पांढरा रस्सा बरा होता ' असे उपरोधिकपणे म्हटले आहे. मात्र स्वाभिमानीचे हे शिबिर शंभर टक्के देशी स्वरूपाचे होते. शेतकऱ्यांनी आपले आंथरुण, पांघरुण आणले होते. शिरोळ पंचायत समितीचे सभापती, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती, माळशिरसचे उपसभापती हे पदाधिकारी व नेते शेतकऱ्यांसोबतच वारणावती येथील कट्ट्यावर झोपले होते. झाडांच्या आधाराने जागा मिळेल तेथे लोक बसत होते, ऐकत होते. ऐकता ऐकता झोपत होते. काही जण झोपता झोपता ऐकत होते. कार्यकर्त्यांना आणण्यासाठी गाड्या नव्हत्या. मंडप नव्हता. चहापाणी, नाष्ट्याची मोफ त सोय नव्हती, तरीही राज्याच्या कानाकोपऱ्यातून लक्षणीय उपस्थिती होती. संघटनेच्या कामकाजाबद्दल मनापासून चिंतन करण्यात आले.

### स्वाभिमानीचे निर्णय

- राज्यात विधानसभेच्या ४० व लोकसभेच्या ८ जागा लढवणार.
- अन्न सुरक्षा कायद्याला विरोध करणार.
- गाव, तालुका व राज्य पातळीवर संघटना मजबूत करणार.
- संघटनेत तरुणाईला महत्त्वाचे स्थान देणार.
- संघटनेचा विचार राज्यभर पोचवण्यासाठी वक्त्यांना प्रशिक्षण देणार.





# बिलांवरील व्याज माफीसाठी 'आजरा'चे प्रयत्न

## तिढा सुटणार का?: 'स्वाभिमानी'च्या भूमिकेकडे लक्ष; वाटाघाटी सुरू

मडिलगे : आजरा कारखान्याच्या २००३-०४ च्या गळीत हंगामातील किमान वैधानिक दराप्रमाणे (एस.एम.पी) देय पण थकीत ऊस बिल दोन वर्षांपूर्वी आदा केले. याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजेंद्र गड्ड्यान्नावर व त्यांच्या सहकाऱ्यांनी संघर्ष केला. थकीत मुद्दल मिळाली तरी शुगर केन कंट्रोल ॲक्ट-१९६६ नुसार त्यावरील व्याजही मिळणे आवश्यक होते. ही रक्कम सुमारे दोन कोटी तीस लाख रुपये होती. या प्रश्नावरूनच आजरा, चंदगड आणि 'दौलत' कारखाना संचालकांवर फौजदारी झाली.

आजरा कारखान्याची सद्य:स्थिती आणि वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांची कठोर प्रणाली पाहता एवढी व्याज-रक्कम आदा करणे परवडणारे नाही. कारखाना उणे-नक्तमधून बाहेर काढण्यासाठी अध्यक्ष वसंतराव धुरे व संचालक मंडळ प्रयत्नशील आहेत. त्यामुळे बुधवारी (ता. ३०) होणाऱ्या वार्षिक सभेत शेतकरी सभासदांनी व्याजाची रक्कम माफ करण्यासाठी निर्णायक आवाहन करण्यात येणार असल्याचे समजते. आतापर्यंत हा प्रश्न लावून धरलेल्या स्वाभिमानी संघटनेचेच दोन संचालक सध्या व्यवस्थापनात असल्याने संघटनेची याबाबत कोणती भूमिका असणार, याबाबत उत्सुकता आहे.

कारखान्याच्या २००३-०४ मधील गळिताचे ऊस बिल किमान वैधानिक दरापेक्षा कमी देण्यात आले होते. याची एकत्रित रक्कम एक कोटी ८३ लाख एवढी होती. संघर्षाची भूमिका घेत स्वाभिमानी संघटनेने हा फरक शेतकऱ्यांना मिळवून दिला. आर्थिक स्थिती नाजूक असल्याने कारखान्याने तडजोडीने तीन टप्प्यात ६१-६१ लाखांप्रमाणे ही रक्कम आदा केली. थकीत मुद्दल वसूल झाली तरी ॲक्टमध्ये थकीत रकमेचे त्या कालावधीतील व्याजही आदा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार संघटनेने आक्रमक भूमिका घेतल्यामुळे पुण्याचे तत्कालीन साखर आयुक्त राजगोपाल देवरा यांच्या आदेशाप्रमाणे विभागीय सहसंचालक श्री. खंडागळे यांनी २०१०मध्ये संचालकांवर फौजदारी केली. अशीच कारवाई 'दौलत'च्या संचालकांवरही झाली. याबाबतचे दावे जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहेत.

आजरा कारखान्याची गेल्या वर्षी निवडणूक झाल्यानंतर सत्तापालट झाला. राष्ट्रवादीप्रणित आघाडीने जाहीरनाम्याप्रमाणे कारखाना स्वबळावर चालवून पहिला हंगाम यशस्वी केला; मात्र अद्यापही कारखाना उणे-नक्तमध्ये असल्याने वित्तीय पुरवठा सुरळीत होण्यासाठी व्याजाचे अंदाजे पावणेतीन कोटी रुपये आदा करणे परवडणारे नाही. त्यामुळे व्याजाची रक्कमच माफ करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू असले तरी थकीत देय रकमेबाबत संचालकांवर फौजदारीचा निर्णय घेण्यास भाग पाडलेले श्री. गड्ड्यान्नावर व त्यांच्या सहकाऱ्यांची याबाबत कोणती भूमिका असणार याकडे सर्वांचेच लक्ष वेधले आहे.



वारणावती : (ता. शिराळा) : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्या शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना खासदार राजू शेट्टी. सोबत सदाभाऊ खोत, गजाभाऊ अहमदाबादकर, बी. जी. पाटील

# राजकारणासाठी चळवळ सोडणार नाही

## खासदार शेट्टी : वारणावतीत कार्यकर्ता शिबिराचा समारोप

शिराळा : माझा पराभव करण्यासाठी महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी देव पाण्यात घालण्यास सुरवात केली आहे. मी या खासदारकीकडे चळवळीचे साधन म्हणून पाहतो. माझी खासदारकी शेतकऱ्यांसाठी व त्यांच्या चळवळीसाठी आहे. खासदारकीसाठी चळवळ नाही. त्यामुळे चळवळीचे नुकसान करून माझी खासदारकी टिकणार असेल, तर अशा खासदारकीची मला गरज नाही. राजकारणासाठी मी शेतकरी चळवळीचा वसा कधीच सोडणार नाही, आपली संघटना मजबूत ठेवण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हा, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी कार्यकर्त्यांना केले.

वारणावती (ता. शिराळा) येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे आयोजित दोन दिवसीय कार्यकर्ता अभ्यास शिबिराच्या समारोप प्रसंगी 'स्वाभिमानी पक्ष व संघटनेची राजकीय भूमिका व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावरती होणारा संभाव्य परिणाम' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत होते. यावेळी शेट्टी म्हणाले,'' अन्न सुरक्षा व्यवस्था कायदा हा लवकरच पास केला जाणार आहे. त्यामध्ये दारिद्ररेषेखालील लोकांना २ रुपये गहू व १ रुपये किलो तांदूळ दिला जाणार आहे. हा कायदा निवडणुकीच्या तोंडावरती पास करून याचा डंका वाजवत सध्याचे दिल्लीतील राज्यकर्ते २०१४ ची निवडणूक लढणार आहेत. या कायद्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील लोकांच्यात फू ट पडणार आहे. देशातील सार्वजनिक वितरण व्यवस्था भ्रष्ट असल्याने गरिबांच्या नावाखाली येणारा हा गहू व तांदूळ बाजारात जाणार आहे. आम्ही गरिबांना कमी दरात धान्य देत असताना शेतकरी संघटनेचा याला विरोध असल्याचे चित्र

पान १४ वर ▶

# राजकारणासाठी चळवळ सोडणार नाही

▶ पान १३ वरुन

लोकांच्यात हेच राज्यकर्ते निर्माण करणार आहेत. उद्योग धंद्याच्या माध्यमातून हवेत कार्बनडाय ऑक्साई सोडणाऱ्यांच्यावरती कर बसवून शेतीच्या माध्यमातून हे प्रमाण कमी करणाऱ्या शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचे अनुदान मिळायला हवे. उद्योजक व राजकीयांच्या तावडीतून जमिनी वाचविण्यासाठी आपणाला संघर्ष करावा लागणार आहे. त्यासाठी परिस्थितीनुरूप आपणाला चळवळीतही बदल करावा लागणार आहे. आता लोकांना बदल हवा आहे. स्वच्छ व चारित्र्यसंपन्न चेहऱ्याची जनतेला गरज आहे. तुमच्यावरती सहजासहजी कोणीही विश्वास ठेवणार नाही. त्यासाठी कामातून तुम्ही त्यांच्या विश्वासास पात्र व्हा. संघटनेला प्रशिक्षित कार्यकर्त्यांची गरज आहे. या प्रशिक्षित कार्यकर्त्यांना आठवड्याचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यावरती म हाराष्ट्रातील जनप्रबोधनाची जबाबदारी टाकणार आहोत.''

यावेळी सदाभाऊ खोत, गजाभाऊ अहमदाबादकर, सत्तार पटेल, प्रा. जालिंदर पाटील यांची भाषणे झाली.

विकासराव देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमास सांगली जिल्हाध्यक्ष सयाजीराव मोरे, सत्तार पटेल, जिल्हा परिषद सदस्य रणधीर नाईक, रामचंद्र पाटील, आनंदा पाटील, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सावकर मदनाईक, पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख बी. जी. पाटील, प्रभाकर पाटील, संभाजीराव मेंढे, सांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, मराठवाडा येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

## उपेक्षा आणि प्रेमाचा वर्षावही

मी चळवळ सुरू केली त्यावेळी पहिली १० वर्षे माझ्या नशिबी लोकांच्याकडून उपेक्षा आली. परंतु माझे कष्ट पाहून पुढील १० वर्षांत मी त्याच लोकांचा प्रेमाच्या वर्षात चिंब झालो आहे. त्यामुळे यश सहजासहजी मिळत नाही. आपणाला शाश्वत यश हवे असेल तर शॉर्टकट शोधू नका.

# सोमवारी वीज खंडित करू नये स्वाभिमानी संघटनेची मागणी

चंदगड : वीज वितरण कंपनीकडून दर सोमवारी दुरुस्तीसाठी वीजप्रवाह खंडित केला जातो; परंतु तालुक्याच्या ठिकाणी विविध शासकीय कामांसाठी येणाऱ्या लोकांना त्याचा फटका बसत असल्याने या दिवशी वीजपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे.

सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस असतो. रविवार आणि प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी शासकीय कार्यालयांना सुटी असते. त्यामुळे एखादे महत्त्वाचे काम असेल, तर शुक्रवारनंतर सोमवारी ते काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने लोक तयारी करतात; परंतु या दिवशी वीजप्रवाह खंडित राहत असल्याने लोकांची गैरसोय होते. शासकीय कार्यालयात विविध कामांसाठी मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्या लागतात. त्याशिवाय प्रतिज्ञापत्र, खरेदी- विक्रीचे व्यवहार आदींवरही त्याचा परिणाम होतो. चाळीस ते साठ किलोमीटरहून आलेल्या लोकांना त्याचा मानसिक त्रास होतो. आर्थिक फटकाही बसतो. त्याचा विचार करून कंपनीने दुसरा व चौथा शनिवार आणि दोन रविवारी वीजपुरवठा खंडित केल्यास लोकांची गैरसोय होणार नसल्याचे संघटनेच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.



# सहकार चळवळींमुळे गावांचा विकास

## खासदार शेट्टी : शेडशाळ ग्रामविकास संस्थेच्या इमारतीचे उद्‌घाटन

कुरुंदवाड : ग्रामीण भागातील विकास सेवा संस्थांच्या माध्यमातूनच सहकार चळवळ वाढीस लागली असून त्यामुळे गावांचा विकास झाला आहे, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी शेडशाळ येथे केले.

शेडशाळ ग्रामविकास सेवा संस्थेच्या वतीने २० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नूतन इमारतीच्या उद्‌घाटनप्रसंगी खासदार शेट्टी अध्यक्षावरून बोलत होते. शरद कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र पाटील-यड्रावकर, बांधकाम समिती सभापती सावकर मादनाईक, 'गोकुळ'चे संचालक दिलीप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला.

खासदार शेट्टी म्हणाले, ''विकास सेवा सोसायट्यांचा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या अर्थवाहिन्या मानल्या जातात. शेतकऱ्यांना अल्पदरात विविध सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी विकास सोसायट्यांची आहे. त्यामुळे विकास सेवा सोसायट्यांचा कारभार काटकसरीचा व पारदर्शीपणे होण्याची आवश्यक्ता आहे. सहकारी चळवळ धोक्यात आल्याचे चित्र समाजात दिसते त्यामुळे विश्वस्तांनी अधिक जबाबदारी व प्रामाणिकपणे काम करावे. शेडशाळ ग्राम सेवा संस्थेने अडचणी असतानाही त्यावर मात करीत चांगल्या पद्धतीने कामकाज केले आहे.''

राजेंद्र पाटील-यड्रावकर म्हणाले, ''कर्जमाफीच्या वसुलीचा प्रश्न मोठा असून याचा फटका सोसायट्यांनाही बसणार असल्याने याप्रश्नी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र लढा दिला पाहिजे.''

संस्थेचे अध्यक्ष भोला तकडे यांनी स्वागत केले. दिलीप पाटील, जिल्हा बँकेचे विभागीय अधिकारी ए. बी. पाटील, उल्हास पाटील, प्रा. झाकीरहुसेन पाटील यांची भाषणे झाली. सरपंच कल्पना पोवार, दादा तकडे, बाबूराव शहापुरे, आदिनाथ आरवळ, रावसाहेब चौगुले, रावसाहेब महाडिक, प्रकाश पाटील-टाकवडेकर, भगवान काटे, राजेंद्र जगदाडे, भैयासाहेब पाटील यांच्यासह संस्थेचे संचालक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शशिकांत मुद्दापुरे यांनी सूत्रसंचालन केले. यळगुडे यांनी आभार मानले.

# तिटवेतील शेतकरी मेळाव्याला प्रतिसाद

कसबा वाळवे, ता. ७ : ''स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते सत्तेच्या खुर्चीसाठी स्वतःला विकत नाहीत. म्हणूनच स्वाभिमानीचे जिल्हा परिषदेत पाच सदस्य, शिरोळचे सभापतिपद, बदनाम झालेले जिल्हा परिषदचे बांधकाम खाते स्वच्छ करण्यासाठी त्या खात्याचे सभापतिपद आम्हाला मिळाले'', असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. तिटवे (ता. राधानगरी) येथे मान्यवरांचा सत्कार व शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. सीताराम पाटील अध्यक्षस्थानी होते. स्वाभिमानी युवा आघाडीचे अध्यक्ष राजेंद्र भुकटे यांनी स्वागत केले. पंचायत समिती सदस्य अजित पोवार यांनी प्रास्ताविक केले. नूतन जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार झाला. श्री. शेटी यांचा सत्कार जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष हिंदूराव चौगले यांच्या हस्ते झाला. वासुदेव पाटील, श्री. खानविलकर, किरण नार्वेकरसह बिद्री व वाळवा परिसरातील स्वाभिमानीचे व काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# कोल्हापूर-रत्नागिरी मार्ग होणार निर्धोक

## खासदार राजू शेट्टी : ३८ कोटींचा निधी; विशाळगडला पुलाची उभारणी

कोल्हापूर : कोल्हापूर-रत्नागिरी मार्गावरील वाहतूक आता लवकरच निर्धोक आणि सोयीची होण्यास मदत होणार आहे. रस्त्याच्या मजबुतीकरण आणि खडीकरणासह पूल बांधण्यासाठी ३८ कोटी तीन लाखांचा निधी मंजूर झाला आहे. विशाळगड येथील पुलासाठी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती खासदार राजू शेट्टी यांनी दिली आहे. ३८ कोटी निधीतूनच शिवाजी पुलाला पर्यायी पूल बांधण्यात येणार आहे. या कामासाठी १३ कोटी खर्च होणार असल्याचे श्री. शेट्टी सांगितले.

विशाळगड दर्ग्याला जाण्यासाठी बसस्थानकाजवळील लोखंडी पूल धोकादायक बनला आहे. तो केव्हाही कोसळेल, अशी स्थिती आहे. भाविकांना पुलावरून जाताना जीव मुठीत धरून जावे लागते. या ठिकाणी नवा पूल उभारण्यात येणार असून त्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून ५२ लाखांचा निधी मंजूर झाला आहे.

कोल्हापूर-रत्नागिरी मार्गावर वाहतुकीचे प्रमाण वाढले आहे. तथापि, रस्ता अपुरा असल्याने अनेकदा या मार्गावर वाहतुकीचा बोजवारा उडालेला असतो. केंद्रीय मंत्री सी. पी. जोशी यांच्याशी केलेला पत्रव्यवहार व पाठपुरावा करून या वर्षी रस्त्याच्या डांबरीकरण आणि मजबुतीकरणासाठी ३८ कोटींचा निधी मिळाला आहे. यापैकी आंबा ते कोल्हापूर मार्गाचे रुंदीकरण, मजबुतीकरण आणि डांबरीकरणासाठी २२ कोटी ४४ लाख, बांबवडे येथील पुलासाठी दोन कोटी ५९ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. कोल्हापूर शहराजवळील शिवाजी पुलावर वाहतुकीची मोठी कोंडी होते. ती कमी करण्यासाठी पंचगंगेवर पर्यायी पूल बांधण्यात येणार आहे. त्याचबरोबर वारूळ ते मलकापूर, करंजोशी ते पैजारवाडी, जुळेवाडी खिंड ते बहिरेवाडी व बोरपाडळे ते पन्हाळा मार्गाचे रुंदीकरणही करण्यात येणार असल्याचेही श्री. शेट्टी यांनी म्हटले आहे.

# स्वाभिमानी अभ्यास शिबिरातील क्षणचित्रे



